# व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

युवतींनी स्वतःला अबला न समजता स्वतःचे आरोग्य, करीयर, कुटुंब कौशल्यपूर्ण आत्मनिर्भर केले तर तिला नक्कीच स्वावलंबी जीवन जगता येईल. जगातील कुठल्याही आव्हानाशी ती समर्थपणे तोंड देऊ शकते असा सूर युवती सभा अंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत उमटला.



कबचौ उमविचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि मू.जे.महाविद्यालयाच्या युवती सभेंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा शुक्रवारी १८ रोजी घेण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल सरोदे, सायबर सेलचे पीएसआय अंगद नेमाने, जिल्हा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.पवन पाटील, मू.जे.तील विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.राजीव पवार, युवती सभा प्रमुख प्रा.हेमलता पाटील उपस्थित होते.

प्रथम सत्रात "सायबर सुरक्षितता आणि महिलांविषयक कायदे" याविषयी अंगद नेमाने यांनी मांडणी केली. इन्टरनेटवरून वस्तू खरेदी करताना, वैयक्तिक माहिती शेअर करताना वेबसाईट अचूक आहे कि नाही याची खात्री करून घ्यावी. महिलांच्या छेडखानीचे प्रकार पाहता त्यांनी स्वतःचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल करू नये असे नेमाने म्हणाले.

स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याबाबत कबीर वासंती शेखर यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी चालू घडामोडी आणि एकाग्र वाचनावर भर द्यावा असे ते म्हणाले. तरुणींनी खाण्यापिण्याबाबत काळजी घ्यावी, शरीराचे हाल करू नये, महिलांना अनिमिया नावाचा आजार होण्याचे प्रमाण जास्त आहे, असे मार्गदर्शन स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. चंचल शाह यांनी केले.

करियरच्या विविध संधी याबाबत रत्नप्रभा साबळे यांनी युवतींना सांगितले. सूत्रसंचालन व आभार प्रा. योगिनी राजपूत यांनी केले. जिल्ह्यातील १०० विद्यार्थीनीनी कार्यशाळेत सहभाग घेतला. यशस्वीतेसाठी प्रा.संगीता चंद्रात्रे, प्रा. नूतन राठोड, डॉ. लीना ढाके यांनी परिश्रम घेतले.